# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१५ – १६

### राज्यशास्त्र विभाग

पुण्य नगरी

गुरुवार, ७ जानेवारी २०१६ । पुणे

# ... तर जातीअंताची लढाई लढावी लागेल

## नागनाथ कोत्तापल्ले यांचे मत

। राजगुरुनगर : प्रतिनिधी

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेची निकोप अंमलबजावणी करायची असेल तर आपल्याला जातीअंताची लढाई लढावी लागेल असे आवाहन अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्याविठाचे माजी कुलगुरू डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांनी राजगुरुनगर येथे केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या जात आणि राजकारण या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप प्रसंगी बोलत होते. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अड देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ एस बी पाटील, डॉ. संजय शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी आणि देशभरातील प्राध्यापक उपस्थित होते.

यावेळी डॉ कोतापल्ले बोलताना पुढे म्हणाले की, जात आणि पैसा या डॉन गोष्टी सद्याच्या राजकारणात कळीचे विषय असून लोकशाहीसमोर सर्वात मोठे आव्हान आहे. निवडणुकीच्या काळात पैशाच्या मोहातून सामान्य माणूस आणि जातीच्या कचाट्यातून लोकशाही मुक्त करण्याची गरज आहे. सलग भूमी किव्हा एक धर्म म्हणजे राष्ट्र नसून महात्मा फुले यांनी सांगितलेली एकमय लोक म्हणजे राष्ट्रवाद ही संकल्पना स्वीकारण्याची गरज आहे. कारण आपल्यात जातीव्यवस्थेमुळे झालेल्या फाटाफुटीमुळे खऱ्या अथार्ने ब्रिटिश राज्य करू शकले. आजही समाज जाती जातीत विभागलेला असून दलितांवर गावोगावी अत्याचार होत आहेत. दुसऱ्या बाजूला देशाचे वैविदय सांगताना केले जाणारे जातींचे गौरवीकारण योग्य आहे काय याचा विचार व्हायला हवा. जात केवळ सामाजिक नव्हे तर आर्थिक विषमता निर्माण करते. तेव्हा सदसदविवेकबुद्धी असणाऱ्या आपण सर्वांनी अस्पृशांच्या वेदनांचा विचार करायला हवा आणि जागतिकीकरणात जात धर्म महत्वाचा नसून माणूस महत्वाचा आहे असे ते म्हणाले.



अध्यक्ष अड देवेंद्र बुट्टेपाटील यांनी खेड तालुका हा गुणवत्तेला महत्त्व देणारा तालुका असून जातीच्या आधारावर येथे राजकारण होत नसल्याचे सांगितले. ज्याच्याकडे गुणवत्ता आहे त्याच्या राजकीय प्रगतीला जात आडवी येत नाही असेही ते म्हणाले. या चर्चासत्रात देशभरातून सुमारे 70 संशोधक प्राध्यापकानीं सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस बी पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ विकास रासकर यांनी केले तर आभार या राष्ट्रीय चर्चासत्राचे समन्वयक डॉ कैलास सोनवणे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख